नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०७/१०/२०२६ (बुधवार )

## अवैध प्रवासी वाहतुकीविरूध्द नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई सन २०२६ मध्ये आतापर्यंत ३२८ कारवाया

मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण, आणि श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध व नियमबाहय प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांविरुद्ध नागपूर ग्रामीण पोलीसांकडून सातत्याने तपासणी व कारवाईची मोहीम सुरू आहे.

दिनांक ०६/१०/२०२६ रोजी नागपूर ग्रामीण जिल्ह्यातील उमरेड उपविभागांतर्गत उमरेड ते चिमूर मार्गावर अवैध व नियमबाह्य प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांविरुद्ध नागपूर ग्रामीण वाहतूक पोलीसांकडून विशेष मोहीम राबविण्यात आली. मोहिमेदरम्यान बोलेरो, ट्रॅव्हल्स व इतर प्रवासी वाहनांची तपासणी करण्यात येत असून, आवश्यक वैध परवाना अथवा प्रवासी वाहतूक करण्याचा अधिकार नसताना प्रवाशांची वाहतूक करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध मोटार वाहन अधिनियम कलम ६६(१)/१९२ अन्वये एकुण ०७ कारवाया करण्यात आल्या. जानेवारी २०२६ ते आजपावेतो नागपुर ग्रामीण जिल्हयात अवैध प्रवासी वाहतुकीविरुद्ध एकूण ३२८ कारवाया करण्यात आल्या आहेत.

अवैध प्रवासी वाहतुकीमुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याने, अशा प्रकारच्या वाहनांविरुद्ध नागपूर ग्रामीण पोलीसांची तपासणी व कायदेशीर कारवाईची मोहीम यापुढेही अधिक तीव्रतेने आणि सातत्याने सुरू राहणार आहे..



## एमआयडीसी उमरेड येथे चोरी करणारी टोळी निष्पन्न
## ४ आरोपी अटक, ६ गुन्हे उघडकीस'
## ९ लाख ३५ हजारांचा मुद्देमाल जप्त
## उमरेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड** :— मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री मयंक माधव, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड उपविभाग यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री धनाजी जळक, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन उमरेड यांच्या नेतृत्वात दिनांक ०२/१०/२०२६ रोजी उमरेड पोलीसांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी), उमरेड येथील विविध कंपन्यांमध्ये चोरी करणाऱ्या टोळीला निष्पन्न करून एकूण सहा चोरीचे गुन्हे उघड करून चार आरोपींना अटक केली आहे.

पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत फिर्यादी नामे श्री. सौरभ अनिल खंगार याच्या एमआयडीसी उमरेड येथील प्लॉट क्र. डी—३३ मधील 'विश्वम पेट्रो. केमिकल प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीमध्ये दिनांक २९/०९/२०२६ रोजीचे १९.०० नंतर अज्ञात चोरट्याने कंपनीच्या गोदामाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला व गोदामात ठेवलेला एकूण १,२०,०००/—रूपयाचा मुद्देमाल चोरी करून नेला. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन उमरेड येथे गुन्हा नोंद आहे.

पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत दिनांक ०२/१०/२०२६ रोजी सदर चोरीच्या दाखल गुन्हयाचा तपास करीत असतांना उमरेड पोलीस स्टेशनचे गुन्हे शोध पथकाचे अधिकारी आणि अंमलदार यांनी गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे सदर गुन्हयात **आरोपी १) अभिषेक इंद्रपाल कंगाले, वय २६ वर्षे, रा. तेलकवडसी, ता. उमरेड, २) राहुल रामरावजी कोडापे, वय ३६ वर्षे, रा. घोटी, ता. जि. नागपूर, ३) दिनेश गोपाल मसराम, वय ३९ वर्षे, रा. निलज, ता. पवनी, जि. भंडारा, ४) वैभव गणपतराव सोनटक्के, वय २९ वर्षे, रा. बूटीबोरी** यांना **पोलीस स्टेशन बुटीबोरी हद्दीतुन ताब्यात घेवुन आरोपींकडे कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्यांनी एमआयडीसी उमरेड येथील 'विश्वम पेट्रो केमिकल प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीमध्ये चोरी केल्याची माहीती दिली. तसेच तपासादरम्यान आरोपींनी उमरेड अंतर्गत** उमरेड एमआयडीसी येथे **या व्यतिरिक्त इतर ०५ चोरीचे गुन्हे केल्याची माहीती दिली. उमरेड पोलीसांनी एकुण ०६ गुन्हे उघड केले आहे.**

**पोलीसांनी पंचासमक्ष आरोपींचे ताब्यातून सर्व गुन्ह्यातील चोरीची २,२०,०००/— रूपये रोख रक्कम ,चारचाकी वाहन आणि इतर साहीत्य असा एकुण ९,३५,६७०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर गुन्हयातील आरोपीतांना अटक करण्यात आले आहे.**

**उघड गुन्हे**

**१.पोलीस स्टेशन उमरेड अप. क्र. ९६०/२०२६, कलम ३०५(अ) भान्यासं**

**२.पोलीस स्टेशन उमरेड अप क्र. ९५९/२०२६ कलम ३०५(अ) भान्यासं**

**३.पोलीस स्टेशन उमरेड अप. क्र. ९०६/२०२६ कलम ३०३(२) भान्यासं**

**४. पोलीस स्टेशन उमरेड अप. क्र. ३७१/२०२६ कलम ३०३(२) भान्यासं**

**५. पोलीस स्टेशन उमरेड अप. क्र. ७६६/२०२५ कलम ३०३(२) भान्यासं**

**६. पोलीस स्टेशन उमरेड अप. क्र. ८६८/२०२५ कलम ३०३(२) भान्यासं**



**सायबर सुरक्षा जनजागृती महिना – ऑक्टोबर २०२६ अंतर्गत नागपुर ग्रामीण जिल्हयात राबविण्यात येत आहे सायबर सुरक्षा जनजागृती मोहीम**

नागपुर ग्रामीण जिल्हयात **सायबर सुरक्षा जनजागृती महिना – ऑक्टोबर २०२६ अंतर्गत** मा. श्री. हर्ष ए पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात सायबर सुरक्षा जनजागृती मोहीमेअंतर्गत दिनांक ०७/१०/२०२६ रोजी खालील प्रमाणे सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम घेण्यात आले.

**पोलीस स्टेशन जलालखेडा :–** **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे सहा. पोलीस निरीक्षक श्री. विनोद जांभळे प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन जलालखेडा यांनी जीवन विकास महाविदयालय थुगावदेव (देवग्राम) येथे भेट देवुन सायबर जनजागृती कार्यक्रम घेतला. कार्यक्रमास मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

**पोलीस स्टेशन कोंढाळी :— पोलीस स्टेशन कोंढाळी** श्री पराग पोटे ,उपविभागिय पोलीस अधिकारी ,काटोल यांनी पोलीस पाटील यांची बैठक घेवुन सायबर सुरक्षे बाबत माहीती देवुन जनजागृती केली.

**पोलीस स्टेशन अरोली :— पोलीस स्टेशन अरोली** येथे सहा. पोलीस निरीक्षक श्री. सागर गोमासे प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन अरोली यांनी अरोली पोलीस ठाण्याच्या वतीने अश्वमेध हायस्कूल, धर्मापुरी येथे सायबर सुरक्षे बाबत माहीती देवुन जनजागृती केली.

**पोलीस स्टेशन केळवद :— पोलीस स्टेशन केळवद** येथे सहा. पोलीस निरीक्षक श्री. आशिषसिंह ठाकुर, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन केळवद यांनी पोलीस पाटील आणि दुर्गादेवी मंडळ यांची बैठक घेवुन त्यांना सायबर सुरक्षे बाबत माहीती देवुन जनजागृती केली.

**पोलीस स्टेशन काटोल :— पोलीस स्टेशन काटोल** येथे पोलीस निरीक्षक श्री. रणजित शिरसाठ, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन काटोल यांनी काटोल पोलीस ठाण्याच्या वतीने नबीरा महाविद्यालय, काटोल येथे विद्यार्थी व शिक्षकवृंद यांना सायबर सुरक्षे बाबत माहीती देवुन सायबर जनजागृती केली.

**पोलीस स्टेशन पाचगाव :— पोलीस स्टेशन पाचगाव** येथे पोलीस निरीक्षक श्री. रविंद्र मानकर प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन पाचगाव यांनी पाचगाव पोलीस ठाण्याच्या वतीने विदर्भ इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी कॉलेज, उटी भिवापूर येथे मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, विद्यार्थी व शिक्षकवृंद यांना सायबर सुरक्षे बाबत माहीती देवुन जनजागृती केली.

**सदर कार्यक्रमामध्ये सायबर जनजागृती व्हिडीओ दाखविण्यात आले. सायबर गुन्ह्यांचे विविध प्रकार, बनावट सोशल मीडिया प्रोफाईल, आर्थिक फसवणूक, फसवे कॉल व संदेश यापासून बचाव करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. अनोळखी लिंक, ओटीपी, बनावट नोकरीच्या जाहिराती पासून सावध राहण्याबाबत मार्गदर्शन केले. मॉर्फिंग ,फिशींग, डिजिटल अरेस्ट, ट्रेडींग फसवणुक , तसेच डिजिटल व्यवहारांमध्ये घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर माहीती देवुन सायबर जनजागृती करण्यात आली. फसवणूक झाल्यास तात्काळ 'सायबर हेल्पलाईन १९३० वर संपर्क साधावा किंवा cybercrime.gov.in या संकेतस्थळावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले.**

**नागरिकांनी डिजिटल व्यवहार करताना सतर्कता बाळगावी, कोणत्याही अनोळखी व्यक्तीस वैयक्तिक अथवा बँकिंग माहिती देऊ नये आणि सायबर फसवणूक झाल्यास विलंब न**

हेल्पलाईन क्रमांकावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन नागपूर ग्रामीण पोलीसांकडून करण्यात आले आहे.






पोलीस स्टेशन अरोली अंतर्गत
पोक्सो कायदा विषयी

# आगामी नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागपूर ग्रामीण जिल्हयात घेतल्या शांतता समिती तसेच आयोजकांच्या तसेच इतर बैठका

**आज दिनांक ०७/१०/२०२६ रोजी मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात आगामी नवरात्रोत्सवाच्या तसेच विविध धार्मिक उत्सवांच्या पार्श्वभूमीवर सणोत्सव बंदोबस्त असल्याने कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नागपूर ग्रामीण जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशन येथे आगामी सणोत्सवांच्या निमित्य विविध बैठका घेण्यात आल्या.**

**पोलीस स्टेशन कोंढाळी** :– आगामी नवरात्रोत्सवाच्या श्री पराग पोटे ,उपविभागिय पोलीस अधिकारी ,काटोल यांच्या अध्यक्षेतेखाली सहा पोलीस निरीक्षक श्री रोशन बावनकर, पोलीस स्टेशन कोंढाळी यांच्या उपस्थितीत आगामी नवरात्रोत्सव सण उत्सवांच्या अनुषंगाने कोंढाळी पोलीस ठाणे हद्दीतील पोलीस पाटील यांची बैठक घेण्यात आली.

**पोलीस स्टेशन वेलतुर** :– पोलीस निरीक्षक श्री प्रशांत काळे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन वेलतुर यांनी आगामी नवरात्रोत्सव व इतर सण–उत्सवांच्या अनुषंगाने डिजे मालक व ऑपरेटर यांची बैठक घेतली.

**पोलीस स्टेशन अरोली** :– सहा. पोलीस निरीक्षक श्री सागर गोमासे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन अरोली यांनी नवरात्रोत्सव व इतर सण–उत्सवांच्या अनुषंगाने पोलीस पाटील तसेच दुर्गा देवी मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली.

**पोलीस स्टेशन भिवापुर**:– सहा. पोलीस निरीक्षक श्री अजितसिंह देवरे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन भिवापुर यांनी आगामी नवरात्रोत्सव व इतर सण–उत्सवांच्या अनुषंगाने पोलीस पाटील व दुर्गा देवी मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली.

**पोलीस स्टेशन केळवद** :– सहा. पोलीस निरीक्षक श्री आशिषसिंग ठाकूर, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन केळवद यांनी नवरात्रोत्सव व इतर सण–उत्सवांच्या अनुषंगाने पोलीस पाटील व दुर्गा देवी मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली.

**नवरात्रोत्सव शांततेत व उत्साहपूर्ण वातावरणात पार पाडण्यासाठी नागरिकांनी तसेच उत्सव मंडळांनी पोलीस प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. दुर्गा उत्सवाच्या अनुषंगाने गावातील दुर्गा उत्सव मंडळांना नियमानुसार आवश्यक परवानगी घेणे,**

डीजे व ध्वनी प्रदूषणाबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाने निर्धारित केलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करणे, गर्दीच्या ठिकाणी कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पुरेशा स्वयंसेवकांची नियुक्ती करणे तसेच कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी सूचना देण्यात आल्या.









बिट

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद, ०६ लाख ५ हजारांचा मुद्देमाल जप्त मौदा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक ०६/१०/२०२६ रोजी मौदा पोलीस पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी नवेगाव शिवार येथे नाकाबंदी केली असता एक महिंद्रा कंपनीचा ट्रॅक्टर क्र. एम एच—४०/सी क्यु—८८७० हा विना क्रमांकाची ट्रॉलीसह मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. आरोपी **वाहन चालक / मालक दीपक नेमराज राजगिरे, वय २९ वर्ष, धानला, तहसील मौदा, जिल्हा नागपूर हा मिळुन आला.** आरोपीस रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली.

**पोलीसांनी पंचासमक्ष ट्रॅक्टर क्र. एम एच—४०/सी क्यु—८८७० किंमती ५,००,०००/— रूपये आणि विना नंबरची ट्रॉली किंमती १,००,०००/—रूपये, ०१ ब्रास रेती किंमती ५,०००/— रूपये असा एकुण किमती ६०५०००/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. नमुद आरोपी वाहन चालक दीपक नेमराज राजगिरे, वय २९ वर्ष, धानला, तहसील मौदा, जिल्हा नागपूर याच्या विरूध्द पोलीस स्टेशन मौदा येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं २०२३, सहकलम ४८(७), ४८(८) खान खनिज अधिनियम, ४, २१, सहकलम ३ सार्वजनिक संपती नुकसान अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, ०३ लाख १० हजार रूपयांचा मूद्देमाल जप्त केळवद पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन केळवद** :— दिनांक ०६/१०/२०२६ रोजी केळवद पोलीस पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, महाराष्ट्रात प्रतिबंध असलेला सुगंधित तंबाखुची अवैधरित्या वाहतुक केली जात आहे. अशी माहीती प्राप्त होताच केळवद पोलीसांनी

रामपुरी फाटा ते जटामखोरा रोडवर नाकाबंदी करत कारवाई केली असता **आरोपी पप्पु दिपक निखारे, वय ३६ वर्ष, रा. हनुमान मंदीर जवळ न्यु फुटाळा, अमरावती रोड, नागपुर** हा टाटा बोल्ट चारचाकी वाहन क्र. एम एच– ३१/एफ सी–१३२८ सह मिळुन आला. पंचासमक्ष वाहनाची झडती घेतली असता महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुंगधीत तंबाखु मिळुन आला. **पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष एकुण प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु एकुण वजन ११६.८ किलो ग्रॅम किंमती १,००,११०/– रूपये व चारचाकी वाहन क्र. एम एच– ३१/एफ सी–१३२८ किंमती २,००,०००/–रूपये, ०१ मोबाईल किंमती १०,०००/–रूपये असा एकुण ३,१०,११०/– रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

नमुद आरोपीतांनी सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उत्पादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने वाहतूक केली आहे. आरोपीविरूद्ध पोस्टे केळवद येथे अन्न सुरक्षा आणि मानके अधि. २००६ सहकलम १२३, २७४, २७५, २२३ भारतीय न्याय संहीता अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर आरोपीस अटक करण्यात आली आहे.

## अवैध दारू निर्मिती, विक्री आणि सेवन करणाऱ्यांवर १० गुन्हे दाखल,

**दिनांक ०६/१०/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूची निर्मिती, विक्री, साठवणूक तसेच दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध प्रभावी कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकूण १० गुन्हे दाखल केले.**

**पोलीस स्टेशन केळवद** येथे आरोपी नामे दुर्गेश बाबुराव भिवनकर, वय ६१ वर्ष, रा. वार्ड क्र. २, रामपुरी ता. सावनेर याचेवर ०१ गुन्हा नोंद, तसेच आरोपी नामे १) धर्मपाल सुखदेव राऊत, वय ४० वर्ष, २) चंद्रपाल प्रमोद रंगारी, दोन्ही रा. वार्ड क्र. ०४, केळवद ता. सावनेर, जि. नागपुर यांचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन सावनेर** येथे आरोपी विनोद शिवदायल छाले, वय ४९ वर्ष, रा. वार्ड क्र ०४, महात्मा फूले नगर सावनेर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन काटोल** येथे १) राजा लोकचंद राजपुत, वय ५० वर्ष, २) मनोज मदन पवार,

वय ४० वर्ष, दोन्ही रा. डोंगरगाव यांचेवर ०१ गुन्हा नोंद, ०३ महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन वेलतूर** येथे आरोपी नामे नितेष नंदकुमार उके, वय ३१ वर्ष, रा. नवेगाव पुनर्वसन, ता. कुही जि. नागपुर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन भिवापूर** येथे आरोपी नामे प्रज्वल गजानन गोडे, वय २३ वर्ष, रा.मेंढा, ता. भिवापुर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन अरोली** अलताफ चांद शेख, वय ४० वर्ष, रा. वार्ड क्र. ४, अरोली याचेवर ०१ गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण ४८६० मिली देशी दारू, २६० लिटर मोहाफुल दारू, ४०० लिटर मोहाफुल सडवा, असा एकुण ३५,१६०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

**जनसंपर्क अधिकारी**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**